# University of Mumbai

## परिपत्रक

No.Enrol/Elg./(2024-25) /525 of 2024

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, संचालक उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने Enrol./Elg./Admission/316/ of 2024 दिनांक २१ मे, २०२४ अन्वये प्रथम वर्ष (First Year) प्रवेश प्रक्रियेबाबत (Time Table) जाहिर केले होते.

वेळापत्रकाप्रमाणे दिनांक १३ जून, २०२४ रोजी पहिली गुणवत्ता यादी (First Merit List) जाहीर करण्यात आलेली आहे. परंतु काही विद्यार्थी http://muugadmission.samarth.edu.in या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करु शकले नाहीत, त्यामुळे अशा विद्यार्थ्यांसाठी http://muugadmission.samarth.edu.in या संकेतस्थळावरील प्रवेश नोंदणी लिंक दिनांक १९ जून,२०२४ पासून प्रवेश नोंदणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची लिंक ही विद्यार्थ्यांना दिनांक २९ जून, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपासून नोंदणीसाठी खुली असेल या लिंक मधुन विद्यार्थी आपली प्रवेश नोंदणी करु शकतील. जे विद्यार्थी दिनांक २९ जून,२०२४ पासून प्रवेश नोंदणी करतील अश्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी तिस-या गुणवत्ता यादीची (Third Merit List) प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर गुणवत्ता यादीत समावेश करुन प्रवेश प्रक्रियेत सामील करावे किंवा ज्या महाविद्यालयाची गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाली असेल व जागा रिक्त असतील अशी महाविद्यालये सदर विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया लगेचच सुरु करु शकतील. सदर विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल त्या संबंधित महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रवेश अर्ज भरावे लागतील. त्याचबरोबर सदर प्रवेश देताना शासनाच्या आरक्षण धोरणाचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी घ्यावी.

तरी सदरची बाब ही सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यार्थी व प्रवेश प्रक्रियेशी संबंधित सर्वांच्या निदर्शनास आणुन दयावी.

(डॉ. पूजा रौंदळे)<br>
संचालक,<br>
परीक्षा व मुल्यांकन विभाग

ठिकाण : मुंबई - ४०००९८<br>
दिनांक : २९ जून, २०२४

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी -<br>
मुंबई विद्यापीठाशी संलग्नित / संचलित सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक

स्वीय सहाय्यक: १)कुलगुरु २)प्र-कुलगुरु ३)प्रभारी कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ